**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २७६** **दिनांक :- ०२/१०/२०२१**

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधुन महिलांच्या तक्रारी सोडवण्यासाठी 'भरोसा सेल' कक्षाची स्थापना.

मिरा-भाईंदर शहराची वाढती लोकसंख्या व महिला हिसांचार/कौटुबिंक हिसांचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभुमीवर महिलांच्या तक्रारींना प्राधान्य देवून त्यांचे समुपदेशन करुन मानसिक आधार देणे व त्यांच्या तक्रारीचे तात्काळ निवारण करणे याकरीता मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांच्या संकल्पनेतुन सहाय्यक पोलीस आयुक्त, भाईंदर कार्यालय, पहिला माळा, भाईंदर पोलीस ठाण्याच्या पाठीमागे, भाईंदर (प.) येथे मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते 'भरोसा सेल' कक्षाचे दि.०१.१०.२०२१ रोजी उद्घाटन करण्यात आले.

भरोसा कक्षाच्या माध्यमातून मुख्यत्वेकरुन महिलांशी संबंधित तक्रारींचे निवारण केले जाणार आहे. तसेच कौटुंबिक वाद-विवाद/कलह समोपचाराने कसे सोडवता येईल? यादृष्टीने भरोसा सेल कक्षामध्ये महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अंमलदार काम पाहणार आहेत.

मिरा-भाईंदर परिमंडळ ०१ मधील पोलीस ठाण्यात महिलांच्या संबंधित तक्रारी भरोसा कक्षाकडे पाठविण्यात येणार आहेत. कक्षामध्ये महिला पोलीस अधिकारी, समुपदेशक, मानसोपचार तज्ञ, एन.जी.ओ., एम.एस.डब्ल्यु., वकिल व संरक्षण अधिकारी यांचा सामावेश असुन महिलांच्या समस्या जाणुन घेवुन समोपचाराने वाद मिटवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

सदर कार्याक्रमासाठी मा. श्री एस. जयकुमार, अप्पर पोलीस आयुक्त, डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), सहा. पोलीस आयुक्त, श्री शशिकांत भोसले, श्री. रामचंद्र देशमुख, श्री शांतीलाल जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संपतराव पाटील, श्री. मुकुटलाल पाटील, श्री. मिलिंद देसाई, श्री. प्रशांत लांगी, मसपोनि. तेजश्री शिंदे- भरोसा सेल, पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.



वसई-विरार पोलीस आयुक्तालय
भरोसा सेल
पिडीत महिला व बालके यांना एकाच छताखाली
विविध सेवा पुरवून त्याद्वारे मानसिक बळ देवून
त्यांचे पुर्नवसन करणेकरिता 'भरोसा' या एकात्मिक
श्री एस. जयकुमार
अपर पोलीस आयुक्त
मि.भा.व.वि
पोलीस आयुक्तालय